# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट १०-२३** **दिनांक १०/०१/२०२३**

## बांग्लादेशी पुरुष वेश्यादलालास अटक करून एका पिडीत बांग्लादेशी मुलीची वेश्याव्यवसायातुन सुटका- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांची कारवाई.

दिनांक ०९/०१/२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा विभाग येथील पोलीस निरीक्षक संतोष चौधरी यांना माहिती मिळाली कि, रुम नं ०२ सुरज बिल्डिंग तलाठी कार्यालयाचे समोर नालासोपारा पूर्व या ठिकाणी एक बांग्लादेशी वेश्यादलाल नामे रुबेल मंडल हा एका महिलेला तिचे इच्छेविरुध्द वेश्याव्यवसाय करून घेतो तसेच तिचा शारिरिक छळ करीत आहे अशी माहिती प्राप्त झाली. सदर माहितीच्या आधारे पोनि/चौधरी यांनी महिला पंच व स्टाफ यांचेसह जावून छापा कारवाई करून अवैध्यरित्या राहणारा पुरुष बांग्लांदेशी वेश्यादलाल नामे रुबेल मंडल याला ताब्यात घेवून चौकशी केली असता इतर सात वेश्यादलालामार्फत तो सदर महिला व इतर महिला यांना वेगवेगळया पुरुषानां वेगवेगळया ठिकाणी वेश्या व्यवसायासाठी जबरदस्ती पाठवीत असल्याबाबत माहिती मिळाली. सदरचा वेश्यादलाल हा वेगवेगळया गि-हाइकाकडून तीन ते चार हजार रुपये घेवून पिडित महिलेला ८०० रु देत असतो अशी माहिती मिळाली. दिनांक ०९/०१/२०२३ रोजी सदर पिडीत महिलेला वेश्याव्यवसायासाठी पाठवीत असताना महिलेने त्यास प्रतिकार केल्याने त्याने सदर महिलेस मारहान करून तिचा शारिरिक छळ केल्याची माहिती सदर महिलेने दिलेली आहे. सदर वेश्यादलाल याचे इतर सात वेश्यादलाल साथीदार यांच्याविरुध्दही गुन्हा नोद करण्यात आलेला असून त्याचा शोध घेण्यात येत आहे.

सदर कारवाईबाबत यातील पिडीत महिलेकडे चौकशी केली असता तिला सुमारे तिन वर्षापूर्वी बांग्लादेशामधून घरगुती कामाचे आमिष दाखवून अवैध्यरित्या भारतामध्ये आणले गेले तसेच तिच्याकडून बंगलोर, मुंबई व नालासोपारा या ठिकाणी बळजबरीने वेश्याव्यवसाय करून घेतला गेल्या बाबतची माहिती तिने दिली आहे. नमूद महिलेचा सविस्तर जबाबत नोदवून आचोळे पोलीस स्टेशन गु. र. नं. २०/२०२३ भादंवि ३७६, ३७०(१), ३४२, ३२३, ३४ सह पिटा ॲक्ट ४, ५ व भा.पा.अधि.१९२० चे क ३ (अ) (ब) ६(अ) सह १२ विदेशी अधिनियम १९४६ चे कलम १४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री अविनाश अंबुरे, पोलीस उपआयुक्त (गुन्हे), श्री अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि/संतोष चौधरी, पोहवा/०७०५५ शेटये, मपोहवा/०५००४ डोईफोडे, मपोहवा/०८००३ तिवले, चालक पोहवा/०७०६६ पागी, मपोशि/जगदाळे सर्व नेम.अनै.मा.वा.प्र.कक्ष नालासोपारा यांनी केली असून सदर कामी रेस्कयू फाउन्डेशन कांदीवली यांनी मदत केली आहे.